# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ८२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/१२/२०१६

**१) १ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १५/१२/२०१६ चे ०९.३० वा. दर. यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरमध्ये अवैधरीत्या ०१ ब्रास रेती भरून दाभा चेक पोष्ट येथुन भंडारा कडे जात असतांनी फिर्यादीने ट्रॅक्टर चालकास हात दाखवुन थांबवीले असता चालकाने ट्रॅक्टर थांबवितो असे सांगुन भंडारा कडे ट्रॅक्टर घेवुन पळुन गेला व रोडवरील गणेश नगरी येथे ट्रॅक्टरचे ट्राली मधील ०१ ब्रास रेती कि. २,०००/–रू ची खाली करून गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. वरखडे पो.मु. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीरामे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी. :–**

**अ)** दिनांक १४/१२/२०१६ चे २२.३० ते १५/१२/२०१६ चे ०५.०० वा. दर. यातील फिर्यादी अतीकुर अमिनुर रहमान वय ३८ वर्ष, रा. तिळक वार्ड भंडारा यांनी आपली हिरो होंडा स्पलेडंर मोटार सायकल क्र. एमएच ३१ डी एक्स. ४६६४ कि. २०,०००/–रु. ची घरा समोर लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १४/१२/२०१६ चे २२.३० ते १५/१२/२०१६ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी रंजीत वैकुंट पात्र वय ३२ वर्ष, रा. राम मंदीर वार्ड भंडारा यानी आपली हिरो होंडा स्पलेडंर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन. २७१६ कि. २०,०००/–रु. ची घरा समोर लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एकाचा मृत्यु . :–**

दिनांक १५/१२/२०१६ रोजी ०६.४५ वा. दर. यातील मृतक सुरेन्द्र विठ्ठलराव राजबांधे वय ४५ वर्ष, रा. किटाळी हा आपल्या मुलासह पालांदुर वरुन किटाळी या गावी मोटार सायकल क्र. एमएच ३१ ए. आर २६८४ ने जात असता यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी नरेन्द्र विठ्ठलराव राजबांधे वय ३८ वर्ष, रा. किटाळी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. वाढीवे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**४) अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १५/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर, पवनी व लाखनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५४ लिटर हातभट्टी दारू कि. ३,७००/–रू. व ०६ लिटर १२०मिली देशी दारू कि. ५,४००/–रू तसेच जुगारातुन १८५/–रू असा एकुण ५,५८५ /–रू चा माल जप्त करण्यात आला .

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.